International Journal of Engineering, Science and Humanities
An international peer reviewed, refereed, open-access journal
Impact Factor 7.2 www.ijesh.com ISSN: 2250-3552

# इंटर्नशिपचा बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या आकलनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**सुनिल यशवंतराव देसले**
सहाय्यक प्राध्यापक, गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय संगमनेर जि. अहिल्यानगर

**सारांश**

शिक्षक शिक्षण प्रक्रियेमध्ये इंटर्नशिपला विशेष महत्त्व आहे. बी.एड. अभ्यासक्रमातील इंटर्नशिपच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना शाळेतील प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव मिळतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये अध्यापन कौशल्ये, वर्ग व्यवस्थापन क्षमता, शैक्षणिक नियोजन, मूल्यमापन कौशल्ये आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता विकसित होते. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश इंटर्नशिपचा बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या आकलनावर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला. संशोधनासाठी संगमनेर येथील दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालयांतील बी.एड. अभ्यासक्रमाच्या 100 प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची नमुना म्हणून यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली होती. माहिती संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण सूची या साधनांचा वापर करण्यात आला. प्राप्त माहितीचे विश्लेषण शेकडेवारीच्या आधारे करण्यात आले. या संशोधनातून इंटर्नशिपमुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन कौशल्यांमध्ये सकारात्मक बदल झाला. पाठ नियोजन, अध्यापन तंत्रांचा वापर, वर्ग व्यवस्थापन, विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेणे आणि आत्मविश्वास वाढविणे यासाठी इंटर्नशिप उपयुक्त ठरल्याचे निष्कर्ष मिळालेले आहेत.

**मुख्य संबोध:** इंटर्नशिप, बी.एड. प्रशिक्षणार्थी, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, शिक्षक शिक्षण

## 1. प्रास्ताविक

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी व कुशल शिक्षकांची आवश्यकता असते. शिक्षक तयार करण्यासाठी शिक्षक शिक्षण कार्यक्रमामध्ये सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवाला महत्त्व दिले जाते. बी.एड. अभ्यासक्रमामध्ये इंटर्नशिप हा प्रशिक्षणाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. इंटर्नशिपच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना शाळेच्या प्रत्यक्ष वातावरणाचा अनुभव मिळतो. शाळेतील दैनंदिन कामकाज, अध्यापन प्रक्रिया, विद्यार्थ्यांशी संवाद, मूल्यमापन पद्धती आणि शिक्षकांच्या जबाबदाऱ्या यांचे आकलन होते. अध्यापन ही केवळ ज्ञान देण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन योग्य अध्यापन पद्धतींचा वापर करण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यावसायिक विकासामध्ये इंटर्नशिपची भूमिका अभ्यासणे आवश्यक असल्याने प्रस्तुत आहे.

**International Journal of Engineering, Science and Humanities**
An international peer reviewed, refereed, open-access journal
Impact Factor 7.2 www.ijesh.com ISSN: 2250-3552

## 2. संशोधन पार्श्वभूमी

परंपरागत शिक्षक शिक्षणामध्ये सैद्धांतिक ज्ञानावर अधिक भर दिला जात होता. मात्र आधुनिक शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाकडे विषयज्ञानाबरोबरच अध्यापन कौशल्ये, तंत्रज्ञानाचा वापर, वर्ग व्यवस्थापन आणि विद्यार्थीकिंद्रित अध्यापनाची क्षमता असणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने शिक्षक प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष शालेय अनुभवाला महत्त्व दिले आहे. इंटर्नशिप हा प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष तसेच नैसर्गिक वातावरणात शैक्षणिक परिस्थितीशी जोडणारा महत्वाचा दुवा आहे.

इंटर्नशिपमुळे प्रशिक्षणार्थ्यांना अध्यापनातील अडचणी समजतात, त्यावर उपाय शोधण्याची क्षमता विकसित होते आणि शिक्षक म्हणून आवश्यक कौशल्यांचा विकास होतो. त्यामुळे बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या आकलनावर इंटर्नशिपचा होणारा परिणाम जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन करण्यात आले.

## 3. संशोधनाची उद्दिष्ट्ये

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली होती.

1. बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या आकलनावर इंटर्नशिपचा परिणाम अभ्यासणे.
2. इंटर्नशिपमुळे बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन कौशल्यांमध्ये होणारे बदल जाणून घेणे.
3. बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या वर्ग व्यवस्थापन क्षमतेचा अभ्यास करणे.
4. इंटर्नशिपमुळे बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या आत्मविश्वासामध्ये होणारा बदल अभ्यासणे.
5. बी.एड. इंटर्नशिपदरम्यान येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
6. बी.एड. इंटर्नशिप अधिक प्रभावी करण्यासाठी शिफारशी करणे.

## 4. संशोधन कार्यपद्धती

### संशोधन पद्धती

बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या इंटर्नशिप अनुभवांचा व अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवरील परिणामांचा अभ्यास करायचा असल्याने, प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला.

### नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर येथील दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची यादृच्छिक पद्धतीने निवड करून त्या दोन महाविद्यालयांतील बी.एड. अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाच्या 100 प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची निवड प्रतिसादक म्हणून करण्यात आली.

### संशोधन साधने

प्रतुत संशोधनाच्या माहिती संकलनासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात आला:

1. **प्रश्नावली:** इंटर्नशिपमुळे झालेल्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील बदलांचा अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली विकसित करण्यात आली.

International Journal of Engineering, Science and Humanities
An international peer reviewed, refereed, open-access journal
Impact Factor 7.2 www.ijesh.com ISSN: 2250-3552

2. **मुलाखत:** प्रशिक्षणार्थी व मार्गदर्शक शिक्षकांच्या मुलाखती घेण्यासाठी मुलाखत शेड्युल विकसित करण्यात आले.
3. **निरीक्षण सूची:** इंटर्नशिप काळातील प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन कौशल्यांचे निरीक्षण करण्यासाठी निरीक्षण सूचीचा विकसित करण्यात आली.

**संशोधन प्रक्रिया**

1. संशोधन विषयाची निवड करण्यात आली.
2. संशोधन उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.
3. दोन महाविद्यालयांतील 100 बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांची यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली.
4. प्रश्नावली, मुलखातीसाठीचे प्रश तसेच निरीक्षण सूची तयार करण्यात आली.
5. प्रश्नावली व मुलाखतीद्वारे माहिती संकलित करण्यात आली.
6. प्राप्त माहितीचे वर्गीकरण, कोष्टकीकरण करून शेकडेवारीच्या सहाय्याने विश्लेषण करण्यात आले.
7. विश्लेषणाच्या आधारे निष्कर्ष काढून शिफारशी करण्यात आल्या.

## 5. माहितीचे विश्लेषण

संशोधनासाठी निवडलेल्या 100 बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रश्नावली द्वारे नोंदविलेले प्रतिसाद, केलेले निरीक्षणे आणि मार्गदर्शकांच्या मुलाखतीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे शेकडेवारीच्या आधारे विश्लेषण करण्यात आले.

विश्लेषणातून पुढील बाबी स्पष्ट झाल्या:

1. बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी इंटर्नशिपमुळे अध्यापन प्रक्रियेचे आकलन वाढल्याचे प्रतिसाद नोंदवले.
2. इंटर्नशिपमुळे पाठ नियोजन करण्याची क्षमता विकसित झाली.
3. प्रशिक्षणार्थ्यांना विविध अध्यापन पद्धतींचा प्रत्यक्ष वापर करता आला.
4. वर्ग व्यवस्थापन कौशल्यामध्ये सुधारणा झाली.
5. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजा व अडचणी समजून घेण्यास मदत झाली.
6. अध्यापन करताना येणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता वाढली.
7. काही प्रशिक्षणार्थ्यांना वेळ व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा वापर आणि शाळेच्या वातावरणाशी जुळवून घेण्यात अडचणी आल्या.

## 6. निष्कर्ष

1. इंटर्नशिप हा बी.एड. प्रशिक्षणातील अत्यंत उपयुक्त घटक आहे.
2. इंटर्नशिपमुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे आकलन अधिक स्पष्ट होते.
3. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन कौशल्यांमध्ये सकारात्मक विकास होतो.
4. प्रत्यक्ष शाळेतील अनुभवामुळे प्रशिक्षणार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.
5. इंटर्नशिपमुळे शिक्षकाची भूमिका व जबाबदाऱ्या समजण्यास मदत होते.

6. इंटर्नशिप प्रशिक्षणार्थ्यांना व्यावसायिक शिक्षक म्हणून घडविण्यास सहाय्यक ठरते.

**7. शिफारशी**

1. बी.एड. अभ्यासक्रमातील इंटर्नशिपचा कालावधीची निवड अधिक विचारपूर्वक करावी.
2. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला अनुभवी मार्गदर्शक शिक्षक उपलब्ध करून द्यावा.
3. इंटर्नशिपपूर्वी आवश्यक उद्बोधन, प्रशिक्षण व मार्गदर्शन द्यावे.
4. तंत्रज्ञानाधारित अध्यापनासाठी प्रशिक्षण द्यावे.
    1. ५. इंटर्नशिपदरम्यान प्रशिक्षणार्थ्यांचे नियमित मूल्यमापन करावे.
5. शिक्षक प्रशिक्षण संस्था व शाळा यांच्यात समन्वय वाढवावा.
6. इंटर्नशिपमध्ये कृती संशोधन, प्रकल्प कार्य व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा समावेश करावा.

**संदर्भ**

1. Aggarwal, J. C. (2014). Teacher Education. New Delhi: Shipra Publications.
2. Best, J. W., & Kahn, J. V. (2006). Research in Education. New Delhi: Prentice Hall of India.
3. Mangal, S. K. (2012). Advanced Educational Psychology. New Delhi: PHI Learning.
4. National Council for Teacher Education (NCTE). (2014). Regulations for Teacher Education Programme. New Delhi.
5. Sharma, R. A. (2011). Teacher Education. Meerut: R. Lall Book Depot.
6. वाघ, एस. एस. (2018). शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे: नित्य नूतन प्रकाशन.
7. कुलकर्णी, पी. आर. (2016). अध्यापक शिक्षण आणि संशोधन. पुणे: डायमंड पब्लिकेशन.